# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्रमांक -68

जा.क.झोपुप्रा/सचिव/परिपत्रक/2004/1038
5 वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051.
दिनांक 28.12.2004

**विषयः** **महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम-2002 अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अर्जदारास देण्यात येणा-या माहिती/कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींसाठी आकारण्यात येण्या-या शुल्काबावत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणकडे "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002" नियम 6(1) नुसार प्राप्त होणा-या अर्जान्वये अर्जदाराने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणचे परिपत्रक क. 36 नुसार अर्जदाराकडून 25/- रूपये अधिक छायांकित प्रतींसाठी 1/- रूपया असे एकूण 26/- रूपये आकारण्यात येते आहेत.

परंतु मा. लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी 'श्रीमती सत्यवती भास्कर मेस्त्री' यांच्या अपिलावर दिनांक 08/12/2004 रोजी दिलेल्या सुनावणी दरम्यान महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम 2002 अन्वये माहिती देताना अर्जदारांकडून अनुसुची नियम 6 (3) नुसार 2 येथे नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसाठी फक्त 0.50 पैसे आकारण्यात यावे असे असताना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अर्जदारास माहिती देताना जे शुल्क आकारण्यात येते ते खूपच जास्त आहे, असे शेरे दिले.

तरी वरील बाब लक्षात घेता यापुढे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 अंतर्गत कलम 6 पोटकलम 3 नुसार कागदपत्रे/माहितीचे छायांकित प्रतींसाठी प्रती पृष्ठ 0.50 पैसे आकारण्यात येतील.

त्याबरोबरच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून परिपत्रक 36 नुसार नकाशा/आराखडेसाठी प्रति नकाशा/आराखडा रूपये 60– प्रमाणे शुल्क आकारण्यात येते व सदर नकाशे/आराखडे हे अर्जदाराने स्वखर्चाने परवानाधारक वास्तुविशारदाच्या मदतीने आरेखित व प्रमाणित करून घ्यावेत असे प्रचलित धोरण होते यामध्ये बदल करून प्रती नकाशा/आराखडा रूपये 60/– एवढे शुल्क आकारण्यात येउन नकाशा/आराखडा याची माहिती अर्जदारास सी.डी. (Compact Disk) मध्ये साठवून प्रदान करण्यात येईल.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
मान्यतेनुसार

**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

प्रती,

1. मा. मु. का. अ. यांचे स्विय सहाय्यक/झोपुप्रा,
2. मा. सचिव यांचे स्विय सहाय्यक/झोपुप्रा
3. मा. वित्त नियंत्रक यांचे स्विय सहाय्यक
4. उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा,
5. उपसंचालक, नगर रचना/झोपुप्रा
6. विधी सल्लागार/झोपुप्रा
7. मुख्य कार्यकारी अभियंता/झोपुप्रा कार्यकारी अभियंता - II/III
8. सहा. निबंधक/झोपुप्रा
9. समाज विकास अधिकारी व जनसंपर्क अधिकारी/झोपुप्रा
10. प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा.
11. माहिती तंत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा